| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार<br>यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,<br>जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१<br>**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in** | |

प्रेस नोट क्र. ३४९/२०२३ दिनांक ०९/१०/२०२३

## Electricity Bill तात्काळ भरण्याचे सांगून फसवणूक करण्यात आलेल्या रक्कमेमधील १,४२,३००/- रुपये परत मिळविण्यात यश - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. अंकुश उपाध्याय रा.मिरारोड यांना त्यांचे मोबाईलवर मॅसेज प्राप्त झाला की, "*तुमचे इलेक्ट्रीसिटी बिल भरलेले नाही तरी बिल भरणा न केल्यास तूमचे विज कनेक्शन कट करण्यात येईल.* तक्रारदार यांनी तात्काळ लाईट बिल भरतो असे सांगितले असता त्यांना त्यांचे मोबाईलवर एक लिंक पाठवुन त्यात त्यांची माहिती भरुन ऑनलाईन पेमेंट करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी लिंक ओपन करुन त्यात आवश्यक ती माहिती भरली असता काही वेळानंतर त्यांचे बँक खात्यातुन १,४७,०००/- रु कपात झाल्याचा मॅसेज त्यांचे मोबाईलवर प्राप्त झाला.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झाल्याबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज दिला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक २२९९-बी/२०२३ दिनांक २९/०९/२०२३ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक झालेली रक्कम ऑनलाईन Play game Platform वॉलेटवर च्या माध्यमातुन पुढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. नमूद पेमेंट गेटवसोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या **रक्कमेपैकी ०१,४२,३००/- रुपये** पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे मोबाईलवर प्राप्त मॅसेज किंवा लिंक यांची पडताळणी केल्याशिवाय कोणतीही कारवाई करु नये.**
- **कोणत्याही लिंक मध्ये किंवा फोन केलेल्या अनोळखी व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **कोणत्याही अनोळखी कॉल/मॅसेज आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/२२००३ कुणाल सावळे यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----